# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 05/06/2021 (शनिवार)

(सायंकाळ)

---

### अवैध गावठी मोहाफुल दारू अड्ड्यात धाड
### पोलिस स्टेशन रामटेक ची कार्यवाही

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील नगरपरीषद रामटेक क्वॉर्टर क्र. 60 येथे दिनांक 03/06/2021 चे 21:00 ते 22.00 वा. दरम्यान पोलिस स्टेशन रामटेक येथील पोलिस स्टाफला गुप्त माहिती मिळाली की, फरार आरोपी नामे– विजु अहिरकर रा. शिवाजी वार्ड रामटेक हा कवडक दुधाळा रोड वरील नगरपरीषद रामटेकच्या क्वॉर्टर क्र. 60 मध्ये अवैधरीत्या मोहाफुल दारूची निर्मिती करून त्याची विक्री करीत आहे. त्यानुसार पथकाने सापळा रचुन घटनास्थळी धाड घातली. दरम्यान घटनास्थळी अवैधरीत्या 800 लिटर मोहाफुल दारु कि. 1,60,000/–रू. व 5,000/–रूपयाचे इतर दारूकरीता आवश्यक सामग्री असा एकुण कि. 1,65,000/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई आकाश सिरसाट यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेके येथे आरोपीविरुध्द कलम 65 (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. दत्तप्रकाश शेंडगे हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे. रामटेकचे ठाणेदार पोनि श्री. प्रमोद मकेश्वर, सहायक पोलीस निरीक्षक श्री. दत्तप्रकाश शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक श्री प्रमोद राउत, पोशि आकाश शिरसाठ, नागराज मोहतुरे सोबत होमगार्ड सैनीक यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर